# संपादकीय

जानेवारी १९८१ मध्ये .. जागाविरोधी आंदोलन झाले. पदव्युत्तर विभागातील प्रवेशामध्ये दलितांसाठी ठेवलेल्या राखीव जागा रद्द कराव्यात या मागणीसाठी अहमदाबाद मेडिकल कॉलेजमधील विद्यार्थी, प्राध्यापक आणि डॉक्टर संपावर गेले. काही दिवसातच हे आंदोलन गुजराथमधील अनेक शहरात पसरले. त्याचप्रमाणे आंदोलन मेडिकल विद्यार्थ्यांपुरते मर्यादित न रहाता इंजिनिअरिंग आणि इतर विद्यार्थ्यांमध्येही पसरले. सर्व राखीव जागा रद्द करा अशी मागणी पुढे येऊ लागली. सामान्य जनतेकडूनही आंदोलनाला पाठिंबा मिळू लागला. मराठवाडा विद्यापीठ नामांतराच्या निमित्ताने मराठवाड्यात जो उद्रेक झाला होता त्याची काहीशी पुनरावृत्ती झाली. दलितांची दिवसेंदिवस प्रगती होत आहे. त्यांची अस्मिता जागृत होत आहे. आजपर्यंत आपल्या पायाशी असणारे हे दलित आज प्रत्येक बाबतीत आपली बरोबरी करू पहात आहेत याबद्दलचा सवर्णांचा राग परत एकदा बाहेर पडला. फक्त दलित विद्यार्थ्यांपुरता तो मर्यादित न रहाता अशिक्षित, गोरगरीब दलितांनाही तो भोवला मारहाण, जाळपोळ इत्यादी स्वरूपात त्यांच्यावर अत्याचार करण्यात आले. ह्या आंदोलनाचे प्रतिध्वनी देशाच्या इतर काही भागातही उमटले. महाराष्ट्रातही थोडा प्रयत्न झाला. पण त्याला फारसा प्रतिसाद मिळाला नाही. ही महाराष्ट्रातील पुरोगामी चळवळीची जमेची बाजू. मराठवाडा विद्यापीठ नामांतर आंदोलनानिमित्त झालेल्या जनजागृतीचा हा थोडाफार परिणाम असण्याची शक्यता आहे. अर्थात म्हणून गाफील राहून चालण्यासारखे नाही. जातीयतेचा भस्मासूर केव्हा डोके वर काढेल ते सांगता येत नाही. म्हणून वेळीच सावधगिरीचे उपाय योजणे आवश्यक आहे.

भारताला स्वातंत्र्य मिळून ३३ वर्षे झाली. तरी दलितांची अपेक्षेप्रमाणे प्रगती झालीच नाही. राखीव जागांचा उपयोग सवर्ण–दलित तफावत भरून काढण्यास होईल असे वाटत होते. तरी प्रत्यक्षात तसे फारसे घडले नाही. कारण राखीव जागांचे धोरण प्रामाणिकपणे, कळकळीने, परिणामकारक पद्धतीने अंमलात आणले गेलेच नाही. घटनेने समानता मान्य केलेली आहे. प्रत्येक व्यक्तीला स्वतःच्या व्यक्तीमत्वाचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यास समान संधी मिळाली पाहिजे. ही समान संधी केवळ कायद्याच्या स्वरुपात कागदोपत्री न रहाता प्रत्यक्षात उतरली पाहिजे. मागास, उपेक्षित घटकांना ती उपलब्ध करून देण्यासाठी खंबीर पावले उचलली पाहिजेत. याच दृष्टीने जोपर्यंत सवर्ण आणि दलित यांच्यामध्ये मोठी सामाजिक–सांस्कृतीक तफावत आहे तोपर्यंत शेकडो वर्षे दडपणूक झाल्यामुळे दुर्बळ बनलेल्या दलितांना समान संधिचा उपभोग घेण्यास समर्थ बनविण्यासाठी राखीव जागा आवश्यक आहेत. हे निर्विवाद सत्य आहे. समाजवादी समाजरचना निर्माण करण्याच्या ध्येयावर खरीखुरी निष्ठा असलेल्यांना ते मान्य करावेच लागेल. पण एवढ्याने भागणार नाही. आपल्याला जे पटेल ते इतरांना पटवून द्यावे लागेल.

आज बेकारीमुळे त्रस्त, निराश झालेल्या, दलितांमुळे आपल्याला नोकऱ्या, कामे मिळत नाहीत अशा गैरसमजुतीखाली वावरणाऱ्या विद्यार्थ्यांना, तरुणांना वस्तुस्थितीची जाणीव करून दिली पाहिजे. दलितांना असलेल्या राखीव जागा रद्द केल्या तरी बेकारीच्या परिस्थितीत फारसा फरक पडणार नाही हे त्यांना समजावले पाहिजे. बेकारी का निर्माण होते ? ती कशी दूर करावयाची, यासंबंधी विचार करण्यास त्याना उद्युक्त केले पाहिजे. दलितांसाठी खरोखरीच किती जागा राखीव आहेत? आजपर्यंत त्यांना त्याचा कितपत फायदा मिळालाय ? यासंबंधीची माहिती त्यांना दिली पाहिजे. अत्यंत अल्प संख्येने दलित अधिकारपदावर असतानाही आज जी नितिमत्ता ढासळलेली आहे, गुणवत्ता खालावलेली आहे ती कोणामुळे आणि कशामुळे याचा डोळसपणे विचार करण्यास त्यांना शिकवले पाहिजे. भावनेच्या आहारी जाणे त्यांना परवडणारे नाही हे त्यांना पटवले पाहिजे. व्यक्तीकेंद्रित विचारापासून त्यांना परावृत्त करून समाजाभिमुख विचाराला प्रोत्साहन दिले पाहिजे. एकसंघ समाज निर्मितीच्या कार्यात त्यांना सहभागी करून घेतले पाहिजे. याबाबत सरकारवर अवलंबून राहणे चालण्यासारखे नाही कारण याबाबतची सरकारची कर्तृकता गेल्या तीस वर्षात दिसलीच आहे. तेव्हा पुरोगामी चळवळीने हे आव्हान स्विकारून जोरदार प्रचार मोहिमा उघडल्या पाहिजेत आणि याबाबत समाजाचे प्रबोधन केले पाहिजे. पण त्याचबरोबर दलितांच्या प्रश्नांचे स्वरूप नेमके काय आहे आणि दीर्घकाळात ते प्रश्न कसे सोडवायचे याबाबत दलित आणि सवर्ण दोघांचेही प्रबोधन करायला हवे. राखीव जागा हा संक्रमण काळातला तात्पुरता उपाय आहे हे लक्षात घेतले पाहिजे. कालांतराने दलितांना राखीव जागेच्या कुबड्या फेकून देऊन समाजाच्या प्रमुख प्रवाहात सामील होण्यासाठी समर्थ बनायचे आहे आणि सवर्णांनाही त्यांना सामावून घेण्याची तयारी करावयाची आहे हे विसरून चालणार नाही.

—संपादक

## स्त्री अत्याचाराविरोधी परिषद—नागपूर

नागपूरच्या बलात्कार विरोधी मंचाच्या वतीने शनिवार दि. २८ मार्च १ ८१ आणि रविवार दि. २९ मार्च १९८१ रोजी महाराष्ट्र राज्य पातळीवर ‘ स्त्री अत्याचार विरोधी परिषद ’ आयोजित करण्यात आली होती. या परिषदेच्या अध्यक्ष श्रीमती सीमा साखरे होत्या. परिषदेचे उद्घाटन मुस्लीम सत्यशोधक समाजाच्या श्रीमती मेहरुन्निसा दलवाई यांच्या हस्ते झाले. प्रमुख अतिथी गेल् ओमवेट होत्या. ह्या परिषदेच्या निमित्ताने प्रसिद्ध करण्यात आलेल्या ‘ आक्रोश ’ ह्या स्मरणिकेचे उद्घाटन प्रा. सौदामिनी राव. संपादक बायजा द्वैमासिक ह्यांच्या हस्ते करण्यात आले. प्रा. कुमुद पावडे ह्यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली तर श्रीमती सुगंधा शेंडे यांनी आभार मानले. शनिवारी दुपारच्या सत्रात स्त्रियांच्या चळवळी व स्वरूप व सिद्धांत यावर प्रा. प्रभा मुठाळ प्रा. मुमताज रहिमतपुरे आणि प्रा. सौदामिनी राव यांची भाषणे झाली. त्यानंतर गटवार चर्चा झाल्या. बलात्कार, हुंडा, समान नागरिक कायदा लोकमाध्यमे, स्त्रियांना मारहाण, दारू व इतर व्यसने, स्त्रियांचे आरोग्य, कुटुंबनियोजन वेश्याव्यवसाय, स्त्रियांचे शिक्षण आणि अर्थार्जन वगैरे विषयावर या चर्चा झाल्या. रात्री ९ वाजता सांस्कृतिक कार्यक्रम झाला. रविवारी सकाळी निरनिराळ्या ठिकाणाहून आलेल्या स्त्रियांनी आपापले अनुभव सांगितले. दुपारी गटवार चर्चेचे अहवाल वाचण्यात आले. संध्याकाळी खुल्या अधिवेशनात अनेक ठराव संमत करण्यात आले. परिषदेला वर्धा, चंद्रपूर, पांढरकवडा, अमरावती अकोला, भंडारा, नागपूर, बुलढाणा, पुणे मुंबई वगैरे ठिकाणाहून आलेल्या सुमारे ३०० महिला उपस्थित होत्या.

‘ बायजा प्रतिनिधी ’